# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:09.10.2025** **वार:गुरुवार**

1. नवी मुंबई विमानतळ, मुंबई मेट्रो तीनचा अखेरचा टप्पा, आणि मुंबई वन ॲपचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण
2. पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक विकासाचं नवं केंद्र ठरेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास आणि
4. पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याचा राज्य शासनाचा निर्णय

**<u>पंतप्रधान</u>**

पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, तरुणांसाठी रोजगार संधी, हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेलं मजबूत पाऊल असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. पंतप्रधानांच्या हस्ते काल नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. जगातली तिसरी सर्वात मोठी देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ असलेल्या भारताला, आगामी पाच वर्षांत विमान वाहतूक देखभाल दुरुस्तीचं जागतिक केंद्र बनवण्याचं उद्दीष्ट आहे असं पंतप्रधानांनी सांगितलं. या विमानतळाबाबत बोलताना पंतप्रधान म्हणाले......

**सभी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट एक ऐसा प्रोजेक्ट है जिसमें विकसित भारत की झलक है। ये छत्रपति शिवाजी महाराज की धरती पर बना है और इसका आकार कमल के फूल जैसा है। यानी ये संस्कृति और समृद्धि का जीवंत प्रतीक है। इस नए एयरपोर्ट से महाराष्ट्र के किसान यूरोप और मिडल ईस्ट के सुपर मार्केट से भी जुड़ जाएंगे। यानी किसान की ताजा उपज, फल, फूल, सब्जी और मछुआरों के उत्पाद तेजी से ग्लोबल मार्केट तक पहुंच पाएंगे।**

या कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह केंद्रिय हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू, हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. या विमानतळामुळं देशातली अनेक ठिकाणं मुंबई आणि नवी मुंबईशी जोडली जातील. वर्षाला 9 कोटी प्रवाशांची वाहतूक करण्याची क्षमता असलेलं हे विमानतळ 2 लाख रोजगार निर्माण करेल, असा विश्वास राममोहन नायडू यांनी यावेळी व्यक्त केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक विकासाचं नवं केंद्र ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विमानतळाचं भूमीपूजन केलं होतं याची आठवण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढली. तर पूरग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारनं मदत द्यावी असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. याच कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते मुंबई मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याचं उद्घाटन करण्यात आलं; तसंच मुंबई वन ॲपचा प्रारंभ करण्यात आला. मुंबई वन या भारतातल्या पहिल्या एकात्मिक वाहतूक सुविधा मंचाबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले....

**या एप वर मेट्रो असेल मोनो असेल, बस असेल, वॉटर टॅक्सी असेल, सबर्बन रेल्वे असेल सगळ्यांकरता आता एकच तिकीट असेल एका तिकिटावर आपल्याला सगळीकडे प्रवास करता येईल अशी संकल्पना या ठिकाणी करण्यात आली आहे त्यामुळे कोणालाही आपण जिथे उभे आहोत तिथपासून आपल्या घरापर्यंत पोहोचण्याकरता जे जे करावं लागेल त्याकरता एका एप वर आपल्याला त्याचा ट्रॅव्हल प्लॅन देखील मिळेल आणि त्याचं तिकीट देखील एका एप वर आपल्याला या ठिकाणी मिळेल.**

**<u>अल्प मुदत अभ्यासक्रम-सोलापूर</u>**

राज्यातल्या विविध औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नव्यानं सुरू होणाऱ्या अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमांचं उद्घाटनही काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं. तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार देण्याच्या दृष्टीनं सर्व औद्योगिक प्रशिक्षण

संस्थांमध्ये अल्पमुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करणं ही काळाची गरज आहे असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. शिक्षण, प्रशिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन स्वतःला सदैव काळाच्या पुढे ठेवण्यासाठी हे प्रभावी माध्यम असल्याचं त्यांनी सांगितलं. या अभ्यासक्रमांचा तरुण पिढीनं पुरेपूर लाभ घ्यावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**मुख्यमंत्री**

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर दोन दिवसांच्या भारत भेटीवर आले असून काल त्यांचं मुंबईत आगमन झालं. त्यांच्या समवेत शिष्टमंडळही आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात आज मुंबईत बैठक होणार आहे. तत्पूर्वी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ब्रिटीश शिष्टमंडळाची भेट घेतली. महाराष्ट्र हे देशातलं सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य आहे, इथं दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. विविध देशातील उत्कृष्ट विद्यापीठांसमवेत केलेल्या भागीदारीमुळे मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळही तयार होत आहे असं सांगून राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**चंद्राकांत पाटील-मुंबई**

पूरग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं आहे. मंत्रालयात काल पूरग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा आढावा घेण्यासाठी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ते बोलत होते.

**ओबीसी वसतिगृह-मुंबई**

इतर मागासवर्गीय समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह, कार्यालय आणि अभ्यासिका उभारण्यासाठी तातडीनं कार्यवाही करून जागा निश्चित करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. यासंदर्भात काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत अनेक जिल्ह्यांमधल्या जागानिश्चितीच्या प्रक्रियेला अंतिम स्वरूप देण्यात आलं.

**त्रिभाषा धोरण समिती-मुंबई**

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगानं राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण अंमलात आणण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सर्व संबंधित घटकांशी विस्तृत चर्चा करणार असून जनमत जाणून घेण्यासाठी तसंच सूचना एकत्रित करण्यासाठी tribhashasamiti.mahait.org या संकेतस्थळावर एक प्रश्नावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरीकांनीही या संकेतस्थळाला भेट देऊन आपलं मत आणि सूचना नोंदवाव्यात असं आवाहन राज्याच्या प्राथमिक शिक्षण परिषदेचे उपसंचालक संजय डोर्लीकर यांनी केलं आहे.

**पोषण प्रशिक्षण-पालघर**

पालघर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकांसाठी 'पोषण भी पढ़ाई भी' या विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आलं होतं. यामध्ये जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर यांनी अंगणवाडी सेविकांशी संवाद साधत बालविकासातल्या या उपक्रमाच्या योगदानाचं महत्व समजावून सांगितलं. तर प्रशिक्षकांनी लहान मुलांचं पोषण, सुरक्षा, संरक्षण आणि देखभालीची सविस्तर माहिती दिली.

**युवकमहोत्सव-नांदेड**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठानं 12 ते 15 ऑक्टोबर दरम्यान 'ज्ञानतीर्थ' हा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवात सुमारे दीड हजार युवक-युवती आपली कला सादर करणार आहेत, असं कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांगितलं. अतिवृष्टी, पूरपरिस्थिती या सारख्या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर हा महोत्सव साधेपणानं साजरा करावा असे निर्देश त्यांनी दिले आहेत.

**उजनी धरण- सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातल्या उजनी धरणात पर्यटन विकासाची महत्वाकांक्षी योजना राबवली जाणार आहे. नैसर्गिक सौंदर्य, जलसंपत्ती आणि पर्यावरणीय संतुलन जपत पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या हेतूनं ही योजना तयार करण्यात आली आहे.

यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती, आर्थिक प्रगतीला चालना मिळेल आणि पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात सर्वांगीण विकास साधला जाईल.

**जिल्हाधिकारी**

पुणे जिल्ह्यातल्या सर्व बँकांनी वार्षिक पत आराखड्यानुसार पीक कर्ज तसंच केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या कर्ज वितरणाचं उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावं, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत. बँकर्सची जिल्हा सल्लागार समिती आणि जिल्हास्तरीय आढावा समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. विविध योजनांचे लाभ देणं, सायबर फसवणुकीबाबत अद्ययावत माहिती देऊन जनजागृती करणं यासाठी बँकांनी आर्थिक साक्षरता मेळावे आयोजित करावेत. स्वयंसहायता समुहाच्या महिलांना त्यात सहभागी करून घ्यावं, असंही जिल्हाधिकारी म्हणाले.

**कारवाई-धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर तालुक्यातल्या मौजे तामलवाडी इथल्या बनावट खत निर्मिती कारखान्यावर काल जिल्हास्तरीय भरारी पथकानं धडक कारवाई केली. सुनावणीनंतर या कंपनीचा खत निर्मिती परवाना तसंच खत विक्री परवाना सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आला. दोषी आढळल्यास अशा कारखान्यांवर आणि विक्रेत्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल,असा इशारा कृषी विभागानं दिला आहे.

**निधन-रत्नागिरी**

कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक सदस्य अरुण नेरूरकर यांचं नुकतंच निधन झालं. नेरूरकर यांनी 'कोमसाप'च्या स्थापनेपासून संस्था वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. ते सुमारे 30 वर्षे रत्नागिरीच्या साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत होते.

**क्रिकेट**

महिला विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. विशाखापट्टणम् इथं दुपारी तीन वाजता सामना सुरू होईल. या स्पर्धेत श्रीलंका आणि पाकिस्तान विरुद्धचे सलग दोन सामने भारतानं जिंकले आहेत.

**हवामान**

सांगली शहरासह अनेक भागात काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. पुण्यातही काल संध्याकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.